(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. XIV / Issue – I ISSN 2277-8063

# महिला सबलीकरणात ग्रंथालयांची भूमिका व करिअरच्या संधी

**Mrs. Pooja Prasad Chavan** Librarian, Rajarshi Shahu Arts and Commerce College, Rukadi.

---

**सार –**

आजच्या विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात ग्रंथालय ही महिला सबलीकरणांमध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडत आहेत ग्रंथालय ही फक्त ग्रंथांचे देवघेव करणारे ठिकाण इतकी मर्यादित संकल्पना राहिली नसून ज्ञान शहाणपण आणि दृष्टिकोनाचे भांडार बनत चालले आहेत 21 वे शतक हे माहिती आणि तंत्रज्ञानाचे युग असून ग्रंथालयांमध्ये विविध प्रकारच्या आधुनिक सेवांचा समावेश वाढत चालला आहे. महिला सबलीकरणांमध्ये ग्रंथालये हि माहिती संशोधन, शैक्षणिक संसाधने, शैक्षणिक, व्यवसायिक विकासाच्या संधी महिलांसाठी उपलब्ध करून देत आहे. पारंपारिक रूढी परंपरा या सर्वांच्या पुढे जाऊन महिला ग्रंथालयांच्या वापरामुळे आपल्या व्यक्तिमत्त्वामध्ये अमुलाग्र बदल घडवून आणू शकत आहेत. ग्रंथालयांच्या परिवर्तनामुळे सर्वसमावेशक जीवन शिक्षणाला प्रोत्साहन मिळत आहे.

**प्रस्तावना -**

२० व्या शतकातील ग्रंथालयांपेक्षा २१ व्या शतकातील ग्रंथालय ही सातत्याने बदलत व नवीन तंत्रज्ञानाशी जुळवून घेत आपली वाटचाल करत आहेत यामध्ये २० व्या शतकाच्या तुलनेत महिला या अनेक क्षेत्रामध्ये आग्रसार होत आहेत. त्यामुळे ग्रंथालय विश्वातही महिला ग्रंथपलांची संख्या वाढत चाललेली दिसत आहे. यासोबतच महिलांमध्ये सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, व्यावसायिक दृष्टीकोन वाढत चालला आहे. महिला या आत्मनिर्भर बनत चालल्या आहेत. हे सर्व त्यांना मिळत असलेल्या माहिती व ज्ञानामुळे शक्य होत आहे. ग्रंथालये हि ना नफा ना तोटा या तत्त्वावर चालणारी संस्था आहे येथे फक्त सेवाभावी मनाने काम केले जाते.

**ग्रंथालय आणि महिला सक्षमीकरण**

ग्रंथालय ही लैंगिक भेदभाव न करता सर्वांच्या ज्ञानात भर घालणारी व माहिती प्रदान करणारी असतात. ग्रंथालयाच्या वापरामुळे महिलांना प्रगतीचे अनेक स्त्रोत, विविध शेत्रातील संधी, कायदेशीर माहिती मिळते त्यामुळे अनेक क्षेत्रांमध्ये महिलांना संधी मिळू शकते. विविध माहिती स्त्रोतांचा वापर करून महिलांच्या निर्णय प्रक्रियेला ग्रंथालयांमुळे प्रोत्साहन मिळते. सध्याच्या युगात शिक्षणाला असलेले महत्त्व समजून ग्रंथालये शिक्षणातील विविध संधी, ज्ञानाची उपलब्धता करून देण्यासाठी सदैव प्रयत्नशील असतात. महिलांना बौद्धिकदृष्ट्या सक्षम करण्यामध्ये ग्रंथालयांचे खूप मोठा स्थान आहे. सुसंस्कृत व सक्षम जीवन जगण्यासाठी महिलांना ग्रंथालय मदत करतात

**महिला सक्षमीकरणात ग्रंथालयांची भूमिका**

**शैक्षणिक सक्षमीकरण**

शिक्षणाद्वारे महिलांना सक्षम बनवणे हा ग्रंथालयीन ज्ञान केंद्रांचा प्रमुख हेतू आहे. प्राचीनकाळा पासून ग्रंथालये हि प्रभावी शिक्षण व्यवस्था, सक्षमीकरणासोबतच सुसंस्कृत समाजाच्या उभारणीसाठी नेहमी प्रयत्नशील असतात. ग्रंथालय ही शिक्षणाद्वारे महिलांना सक्षम बनवण्यासाठी प्रयत्नशील असतात. नवीन नवीन संकल्पनांचा शोध लागत आहे. या आधुनिक युगात टिकून राहण्यासाठी महिलांना शिक्षणाशिवाय पर्याय नाही. शिक्षण हे प्रगतीचेद्वार आहे. शिक्षणामुळे महिला आत्मनिर्भर व सक्षम बनत आहेत. स्वयं-अभ्यासात महिला मुक्तपणे सहभागी होत आहेत. शैक्षणिक अडथळे दूर होत असलेने महिला अनेक क्षेत्रामध्ये प्रगती करत आहेत. ग्रंथालये महिलांना त्याचे विचार प्रभल करण्यासाठी मदत करतात.

**आर्थिक सक्षमीकरण**

ग्रंथालयाच्या वापरामुळे महिलांमध्ये स्वयंरोजगार, उद्योजकता कौशल्य विकासावर आधारित घटकांच्या वापरामुळे महिला या आर्थिक सक्षम बनू शकतात. ग्रंथालय ही स्वयंरोजगार तसेच अनेक स्पर्धा परीक्षांविषयी माहिती पुस्तके उपलब्धता करून देतात. त्यासोबत मार्गदर्शक साहित्य उपलब्ध करून देतात. सध्याचे युग हे स्पर्धेचे युग बनत चालले आहे या युगात महिलांना डिजिटल कोर्सेस व आधुनिक तंत्रज्ञानासंबंधीचे प्रशिक्षण कार्यक्रम ग्रंथालयामार्फत आयोजित करण्यात येतात. आर्थिक सक्षमीकरण

**ग्रंथालय सामाजिक आणि कायदेशीर साक्षरता**

ग्रंथालयांमुळे महिलांना त्यांचे हक्क, कायदे, धोरणे, येणाऱ्या समस्या संबंधी माहितीपर पुस्तके उपलब्ध करून देतात. महिला संरक्षणासाठी विविध मार्गदर्शक कार्यक्रम आयोजित करतात. आरोग्य, मानसिक, सामाजिक किंवा लैंगिक समानता असेल असे विविध कार्यक्रम आयोजित करून महिलांमध्ये प्रबोधनाचे काम करतात.

**डिजिटल साक्षरता**

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापरासाठी महिलांना इंटरनेट संगणक तसेच आधुनिक साहित्य साधनसामग्रीचा वापर करण्याविषयी कौशल्य पर कार्यशाळा आयोजित केल्या जातात ई लर्निंग चे प्रशिक्षण उपलब्ध करून घेतले जाते तसेच या क्षेत्रामध्ये असलेल्या विविध व्यावसायिक व शैक्षणिक संधीचे माहिती उपलब्ध करून दिली जाते.

माहिती तंत्रज्ञानाचे युग म्हणून ओळखले जात असतानाच कृत्रिम बुद्धिमत्ता सध्या खूप मोठ्या प्रमाणात आपले क्षेत्र वाढवत आहे. सध्याच्या या डिजिटल युगामध्ये महिलांना जास्त प्रमाणात आपले बौद्धिक कौशल्य वापरून या जगात टिकून राहणे गरजेचे आहे. त्यासाठी ग्रंथालय हे शिक्षणाचा आधारस्तंभ म्हणून काम करतात.

**मानसिक व सांस्कृतिक सक्षमीकरण**

महिलांना प्रेरणादायी जीवन चरित्र, आत्मचरित्र, यशोगाथा वाचण्यासाठी उपलब्ध करून दिले जाते त्यामुळे त्यामधून त्यांना प्रोत्साहन मिळते. वाचन कौशल्य विकासामुळे महिलांमध्ये स्वतः पुस्तके लिहिण्याची प्रेरणा मिळते त्यामुळे महिला लेखिकांचा जन्म होतो. कथाकथन कार्यशाळा तसेच अनेक पुस्तक क्लब व समुदाय मिर्माण होत आहेत. ग्रंथालयामार्फत मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करून ज्ञान आणि कौशल्याची देवाणघेवाण सोपी होते. त्यामधून महिलांमध्ये एकमेकांना सहकार्याची जाणीव निर्माण होते.

**महिलांना ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या क्षेत्रामध्ये करिअर च्या संधी**

महिला या फक्त वाचक किंवा अभ्यासक म्हणून ग्रंथालयाचा वापर न करता त्या या क्षेत्रामध्ये आपले करिअर करू शकतात. त्यांना या क्षेत्रामध्ये मान, प्रतिष्ठा, आदर सोबत चांगले पैसे देखील मिळू शकतात. त्या एक चांगले जीवन जगू शकतात. महिला कोणत्या कोणत्या प्रकारे ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या क्षेत्रात करिअर करू शकतात पाहू.

**पारंपारिक संधी**

ग्रंथपाल - महिला या सार्वजनिक ग्रंथालय, शैक्षणिक ग्रंथालय, विशेष ग्रंथालय येथे ग्रंथपाल म्हणून काम करू शकतात. ग्रंथपाल म्हणून काम करत असताना त्या स्वतः सबल होतात त्यासोबत विद्यार्थी, इतर महिला वाचक व संशोधक त्याच्या सबलीकरणासाठी प्रयत्न करतात.

सहाय्यक ग्रंथपाल - अनेक ग्रंथालयामध्ये सहाय्यक ग्रंथपाल हे पद असते. ग्रंथपाल सोबत अनेक महाविद्यालय व विद्यापीठांमध्ये सहाय्यक ग्रंथपाल म्हणून काम करू शकतात. ग्रंथालयामध्ये होत असलेल्या अनेक कामांवर लक्ष ठेवणे व काम करून घेणे हे सहाय्यक ग्रंथपालांचे काम असते.

ग्रंथालय सहाय्यक - ग्रंथालयामध्ये अनेक प्रकारची कामे असतात त्यामध्ये ग्रंथांची नोंदणी करणे, देव-घेव करणे, शेल्फिंग करणे अशी कामे महिला करू शकतात.

कॅटलॉगर/ तांत्रिक सहाय्यक -सध्या अनेक ग्रंथालये हि डिजीटल होत आहेत. अनेक नोंदी या संगणकामध्ये कराव्या लागत आहेत त्यासाठी ग्रंथालयामध्ये तांत्रिक सहाय्यक म्हणून काम करता येते.

ग्रंथालय व्यवस्थापक - ग्रंथालयाच्या एकूण कामकाजाचे निरीक्षण करणे ज्यामध्ये कर्मचारी बजेट आणि संसाधने या सर्वांचा समावेश होतो

संशोधक / शास्त्रज्ञ - ग्रंथालय आणि माहिती शास्त्रामध्ये संशोधनाचे काम करता येते

सल्लागार - विविध ग्रंथालयांमध्ये ग्रंथालय चालवण्यासाठी सल्लागारांची आवश्यकता असते सल्लागार म्हणून काम करता येते.

प्राध्यापक - ग्रंथालय आणि माहितीशास्त्र हा डिप्लोमा इन लाइब्ररी सायन्स (D.Li.Sc), बॅचलर ऑफ लाइब्ररी अँड इन्फॉर्मेशन सायन्स (B.Li.Sc), मास्टर ऑफ लाइब्ररी अँड इन्फॉर्मेशन सायन्स (M.Li.Sc), पीएच.डी. इन लाइब्ररी सायन्स आशा शैक्षणिक अभ्यासक्रम उपलब्ध आहेत त्या अभ्यासक्रमांसाठी ज्या महिला पात्र आहेत त्या महिला प्राध्यापक म्हणून काम करू शकतात.

**आधुनिक संधी**

या सर्व पारंपरिक संधी सोबत काही आधुनिक संधी देखील उपलब्ध झाल्या आहेत यामध्ये माहिती आर्किटेक्ट, डेटा प्रशासक, मेटाडेटा विश्लेषक, वेब आर्काइव्हिस्ट, माहिती केंद्रांची संचालक, वरिष्ठ माहिती विश्लेषक, ग्रंथालय आणि माहिती केंद्रांमध्ये मानव संसाधन व्यवस्थापन, निर्देशांक, एकात्मिक ग्रंथालय प्रणाली प्रशासक अशा विविध संधी ग्रंथालय आणि माहितीशास्त्रामध्ये उपलब्ध होत आहेत.

**सारांश –** महिला सबलीकरणामध्ये ग्रंथालयाची भूमिका महत्वाची आहे. ग्रंथालयाच्या वापरामुळे महिलांमध्ये ज्ञान, आत्मनिर्भरता वाढते. त्यासोबत सामाजिक जाणीव जागृती ला चालना मिळते. त्यासाठी ग्रंथालये हि विविध उपक्रम राबवितात जेणेकरून महिला आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या सबल होतील. ग्रंथालय शास्त्र मध्ये महिला आपले करिअर करू शकतात. त्यामुळे त्यांच्या आर्थिक व सामाजिक स्थिती मध्ये बदल होतो. त्या सोबत शासन व सामाजिक संस्था यांनी महिलासाठी ग्रंथालय आणि माहितीशास्त्राच्या उपलब्ध होणाऱ्या संधींना चालना देण्याची गरज आहे.

**संदर्भ**

1. पवार एस.पी., (२००२) : ग्रंथालय आणि माहितीशास्त्र . कोल्हापूर फडके प्रकाशन
2. Schiller, A. R. (1974). Women in Librarianship. In J. V. Melvin (Ed.), Advances in Librarianship.
3. London: Academic press.
4. Dhanavandan, S and Asokan, L (2013). Changing Scenario of Academic Librarian and
5. Libraries: Issues and Challenges E-library Science Research Journal.
6. Prasad, H. N. (1994). Job anxiety and job satisfaction among professional Library Employees:A
   study, Annals of Library Science and Documentation, Vol. 41(2), 41-54.
7. Ribeiro, N (2007). Managing in the Digital Era. Retrieved f
8. Schiller, A. R. (1974). Women in Librarianship. In J. V. Melvin (Ed.), Advances in Librarianship London: Academic press.
9. Dhanavandan, S and Asokan, L (2013). Changing Scenario of Academic Librarian and
10. Libraries: Issues and Challenges E-library Science Research Journal.
11. Prasad, H. N. (1994). Job anxiety and job satisfaction among professional Library Employees:A study, Annals of Library Science and Documentation, Vol. 41(2), 41-54.
12. Ribeiro, N (2007). Managing in the Digital Era. Retrieved f
13. Schiller, A. R. (1974). Women in Librarianship. In J. V. Melvin (Ed.), Advances in Librarianship London: Academic press.
14. Dhanavandan, S and Asokan, L (2013). Changing Scenario of Academic Librarian and
15. Libraries: Issues and Challenges E-library Science Research Journal.
16. Prasad, H. N. (1994). Job anxiety and job satisfaction among professional Library Employees: A study, Annals of Library Science and Documentation, Vol. 41(2), 41-54.
17. Ribeiro, N (2007). Managing in the Digital Era. Retrieved f
18. Schiller, A. R. (1974). Women in Librarianship. In J. V. Melvin (Ed.), Advances in Librarianship London: Academic press.
19. पवार, आर. एस.,(२०१५). ग्रंथालय संघटन. पुणे : दिलीपराज प्रकाशन
20. Kumar, Sunil.,(2009) : The Future of Libraries. New Delhi : Rajat Publication
21. Kaur, Rajwant., (2013) : Women Librarians In India ESS pub delhi 2013
22. Bhagwat, S.G., (2003) : ग्रंथालय व्यवस्थापन . पुणे : युनिव्हर्सल पब्लिकेशन्स
23. https://www.lisedunetwork.com/role-of-library-on-women-empowerment/
24. https://www.ijlsit.org/article-details/5258